# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १३४, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | ४४८९ | १० | देव्हाडा करडी साकोली रस्ता, (रा.मा.३५६), ता. साकोली, जि. भंडारा सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा अंतर्गत देखभाल दुरूस्ती करीता असून सदर रस्त्याची साकोली तालुक्यातील एकूण लांबी सरासरी ३१ कि.मी. असणे, सदर रस्तयावर डिसेंबर २०२१ मध्ये रू. १७० लक्ष किंमती अर्थसंकल्पीय काम मंजूर असणे व मार्च २०२२ मध्ये रू. १५०० लक्ष किंमतीचे अर्थसंकल्पीय काम मंजुर असणे, परंतु सदर दोन्ही कामे स्थगीतीत असल्यामुळे सदर कामांची निविदा न झाल्यामुळे संबंधीत विभागास रस्ता दुरूस्ती करता येत नसणे, त्यामुळे सदर रस्त्यामधील पिंडकेपार ते परसटोला व चांदोरी ते केसलवाडा अशी एकूण लांबी ९ कि.मी. सरासरी अशी अत्यंत खराब असल्यामुळे आजुबाजूतील शेतकरी व दोन्ही तालुक्यातील आवागमण करीता मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ४४९० | १० | पेंढरी खुर्शीपार पुरकाबोडी (प्र.जि.मा. २३) कि.मी. ०/०० ते ७/०० ता.लाखनी, जि. भंडारा सदर रस्ता हा तालुका लाखनी व तालुका भंडारा ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कि.मी. २/९०० ते ३/१०० मध्ये अत्यंत खराब झालेला असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ४४९१ | १० | लाखांदूर मडेघाट पुयार रस्ता (प्रजिमा – ४१) कि.मी. ०/०० ते ८/५० ता. लाखांदूर, जि. भंडारा सदर प्र.जि.मा. - ४१ हा रस्ता ता. लाखांदूर व ता. अर्जुनी/मोरगांव, या दोन्ही तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या वैनगंगा नदीच्या बँक वॉटरमुळे सदर रस्ता हा कि.मी. ०/७०० ते ४/६०० व ७/६०० ते ८/५०० मध्ये अत्यंत खराब झालेला असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ४४९२ | १० | शिवनाळा जुनोना मोहरणा गवराळा चप्राड सोनी रस्ता (प्र.जि.मा. - ४०) कि.मी. १५/०० ते ३९/०० ता. लाखांदूर, जि. भंडारा सदर प्र.जि.मा. - ४० हा रस्ता ता.लाखांदूर व पवनी या दोन तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या वैनगंगा नदीच्या बॅंक वॉटरमुळे सदर रस्ता हा कि.मी. २३/६०० ते २५/५०० व २७/५०० ते ३९/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ४४९३ | १० | ओपारा मांढळ दांडेगांव दहेगांव रस्ता (प्र.जि.मा.४२) कि.मी. ०/०० ते १४/६०० ता. लाखांदूर, जि. भंडारा सदर प्र.जि.मा. – ४२ हा रस्ता लाखांदूर तालुक्यातील महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या चुलबंद व वैनगंगा नदीच्या बॅंक वॉटरमुळे सदर रस्ता कि.मी. ०/०० ते ५/००, ६/०० ते ६/८०० व ७/८०० ते ८/२०० मध्ये अत्यंत खराब झालेला असून याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ४४९४ | १० | सिंदपुरी लाखांदूर अर्जुनी रस्ता (रा.मा.-३५४) कि.मी. १४/०० ते ३९/९५० ता. लाखांदूर, जि. भंडारा सदर रा.मा. ३५४ हा रस्ता भंडारा जिल्ह्यातील पवनी व = लाखांदूर तालुक्यांना तसेच पुढे गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी/मोर या तालुक्यास जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या वैनगंगा नदीच्या बॅंक वॉटरमुळे सदर रस्ता कि.मी. १५/८०० ते १६/०० ते २९/६०० ते ३०/०० ते ३९/६०० ते ३९/९५० मध्ये अत्यंत खराब झालेला असून याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ४४९५ | १० | वडेगांव जांभळी मालुटोला रेंगेपार सातलवाडा रस्ता (प्र.जि.मा.-२८) कि.मी. २०/०० ते ता. साकोली, जि. भंडारा सदर प्र.जि.मा. - २८ हा रस्ता भंडारा जिल्ह्यातील साकोली व गोंदिया जिल्ह्यातील सडक/अर्जुनी या दोन तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता कि.मी. २०/२०० ते २२/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असून याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ४४९६ | १० | एकोडी जांभळी कोसमतोंडी रस्ता (रा.मा.३५७), कि.मी. ०/०० ते १५/९०० तालुका साकोली, जि. भंडारा सदर राज्यमार्ग ३५७ हा रस्ता भंडारा जिल्ह्यातील तालुका साकोली व गोंदिया जिल्ह्यातील तालुका सडक अर्जुनी या दोन तालुक्यांना जोडणारा रस्ता असून भंडारा जिल्ह्यातील रस्त्याची लांबी ही १५.९० कि.मी. असणे, (०/०० ते १५/९००) सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ०/०० ते २/००, ५/०० ते ११/०० व १४/६०० |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ते १५/९०० मध्ये बऱ्याच ठिकाणी खराब झालेला असून येथील स्थानिकांत व प्रवाशांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ४५१८ | १० | मानेगांव पोहरा पालांदूर मऱ्हेगांव रस्ता (रा.मा. ३६१) ता.लाखनी, जि. भंडारा सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा अंतर्गत देखभाल दुरूस्ती करीता असणे, सदर रस्त्याची लाखनी तालुक्यातील एकूण लांबी सरासरी २७ कि.मी.असून सदर रस्त्यावर डिसेंबर २०२१ मध्ये रू. १४०६ लक्ष किंमतीचे दोन अर्थसंकल्पीय काम मंजूर असणे, परंतु सदर दोन्ही कामे स्थगीतीत असल्यामुळे सदर कामांची निविदा न झाल्यामुळे संबंधीत विभागास रस्ता दुरूस्ती करता येत नसणे, त्यामुळे सदर रस्त्यामधील गुरढा ते मऱ्हेगांव अशी एकूण लांबी १३ कि.मी. सरासरी अशी अत्यंत खराब असल्यामुळे आजुबाजूतील शेतकरी व तालुक्यातील लोकांना आवागमण करीता मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने त्यांच्यात पसरलेली असंतोषाची भावना, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४५१९ | १० | लाखोरी खेडेपार रेंगेपार रस्ता (प्र.जि.मा. - २४) कि.मी. ०/०० ते ६/८०० ता. लाखनी, जि. भंडारा सदर रस्ता हा लाखनी तालुक्यातील रा.मा. ३६१ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ५/०० ६/८०० मध्ये अत्यंत खराब झालेला असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (११) | ४५५६ | १० | नाशिक-निफाड-येवला प्रमुख राज्यमार्ग क्र. २ ची अतिशय बिकट अवस्था झाल्यामुळे रस्त्यावर नागरिकांनी आंदोलन केलेले असणे, आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत नाशिक-औरंगाबाद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता देऊन काम चालू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २३ जुलै २०२२, दि. १८ ऑक्टोबर २०२२, दि. ३ डिसेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, नाशिक- निफाड-येवला-वैजापूर- औरंगाबाद रस्ता प्र.रा.मा क्र.२ या चौपदरी रस्ता पिंपळस (ता. निफाड, जि.नाशिक) ते येवला या भागात कि.मी १७९/०० ते २३५/०० दरम्यान अत्यंत खराब झालेला असणे, आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यामधून या रस्त्याची सुधारणा करण्याचे प्रस्तावित असणे या रस्त्याचा ADB अंतर्गत DPR 22 मध्ये समावेश झालेला असणे, या रस्त्याला आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | ४६२२ | १०० | नाशिक जिल्ह्यातील येवला,चांदवड व मालेगांव तालुक्यातील अति रहदारीच्या मार्ग दर्जाचे रस्ते राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नाशिक यांनी दि.१५ जून, २०२२ रोजी शासनाचा प्रस्ताव पाठवलेला असणे, या अति रहदारीच्या तीन रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दि.८ नोव्हेंबर, २०२२ तसेच दि.१५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, नाशिक जिल्ह्यातील अति रहदारीच्या या तीन रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१३) | ४५९८ | १० | दर्यापूर मतदारसंघातील प्रमुख जिल्हा मार्ग , इतर जिल्हा मार्ग व राज्य मार्गावरील रस्ते व पूलांच्या देखभाल दुरुस्ती न झाल्याने मतदारसंघातील रस्त्यांची अतिशय दुर्दशा झाली आहे. तसेच सततच्या पावसाने बहुतांश रस्ते व पूलांचे नुकसान झाले असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे कामे शासनास सुचविले आहे सदर कामांना निधी उपलब्ध करून देण्यात यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१४) | ४५४० | १० | पुणे ते सातारा या महामार्गावरील प्रणव क्षेत्राच्या ठिकाणी निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण झाले असणे, महामार्गावर मोठे खड्डे पडले असणे, गेल्या ६ महिन्यात ८ जणांचा अपघातात मृत्यू झाला असणे, अपघाताची निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्याची आवश्यकता असून ठेकेदारावर कठोर कारवाई करुन ठेकेदाराचे नाव काळया यादीत टाकण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली असणे, शिंदेवाडी ते खेड शिवापूर टोल नाक्यापर्यंत अतिक्रमणे हटविण्याची गरज असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाचे कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १३५, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (१५) | ४५६९ | १०० | लासलगांव ( जि.नाशिक) बाह्य वळण रस्ता आणि रेल्वे क्रॉसिंग ब्रिजसाठी आवश्यक जमिनीचे थेट खरेदी करून भूसंपादन करण्याकरीता येथील शेतकऱ्यांनी आवश्यक संमतीपत्र दिलेले असणे, त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने थेट खरेदीसाठी दर सुद्धा निश्चित करून दिलेले असणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ खरेदीखते नोंदवून शेतकऱ्यांना मोबदला अदा करून लवकरात लवकर थेट खरेदीची कार्यवाही करणे अपेक्षित असणे, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पुरवणी अर्थसंकल्पात रक्कम रु ३१.५० कोटी रुपये निधीची मागणी केलेली असणे, त्याचप्रमाणे या बाह्य वळण रस्त्याचे अपूर्ण काम लवकरात लवकर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पूर्ण करण्याची आवश्यकता, लासलगाव बाहय वळण रस्ता भूसंपादनासाठी निधीची तरतूद करण्यासाठी आणि या रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१६) | ४५९९ | १० | केंद्रीय मार्ग निधी योजने अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव , विहीगाव , कसबेगव्हाण ,खल्लार शिंगणापुर , आमला रस्ता प्रजिमा- १५ सा. क्र. ७/२०० ,मध्ये शहानुर नदीवर पुलाचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव शासनास सादर आहे सादर प्रस्तावास निधीसाह मान्यता देण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१७) | ४५३९ | १० | बरबडी ते सांगवी, ता.पालम, जि.नांदेड हा रस्ता काळया मातीचा असणे, या रस्त्याची संपूर्ण जमीन काळी असणे, काळी जमीन ३० फूट खोल असल्याने खडी, दगड टाकून रस्त्याचे मजबुतीकरण करण्याची आवश्यकता असणे, मोठया प्रमाणावर २ ते ३ फूटाचे खड्डे पडत असणे, परिणामी रस्ता वाहतूकीस अयोग्य होणे, सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस अयाग्य असणे, रस्ता करण्याची नितांत आवश्यकता असणे, रस्त्याअभावी ऊस वाहतुकीस अडथळा निर्माण होत असणे, याकडे शासनाने केलेला अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १३९, रूपये:- ३,०१,०५,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (१८) | ४५७४ | १०० | राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील नाशिक ते मुंबई या रस्त्याच्या दुरावस्थेवर उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, या रस्त्यात पावसामुळे मोठ-मोठे खड्डे पडल्याने वाहनांच्या अपघातात लक्षणीयरीत्या वाढ झालेली असणे, त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झालेला असणे, मोठमोठ्या खड्यांमुळे वाहतुकीसाठी प्रचंड त्रास होत असणे, दरवर्षी पावसाळ्यामध्ये या रस्त्यावरील ठराविक काही भागात खड्यांचे साम्राज्य तयार होते असा भाग आयडेन्टीफाय करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत एन.एच.ए.आय.,टोल कंपनी किंवा राज्य शासनाचे संबंधित प्राधिकरणाकडून कार्यवाही केली जात नसणे, राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वडपे ते गोंदे व गोंदे ते धुळे (महाराष्ट्र राज्य सीमा) हा संपूर्ण रस्ता सहापदरी व कॉक्रीटचा करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला असणे,मात्र शासनाच्या लाल फितीच्या कारभारामुळे त्यास विलंब होत असणे, या रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे नुतनीकरण होईपर्यंत रस्त्याच्या संपूर्ण लांबी मधील कामाचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता असणे,या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सन २०१४ मध्ये पूर्ण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | झालेले असणे,टोलवसुली कंत्राटदराने दर पाच वर्षाने या रस्त्याचे संपूर्ण बळकटीकरण करण्याची अट या कामाच्या आदेशात असणे, मात्र संबधीत कंपन्यांकडून करारातील स्पेसिफिकेशनप्रमाणे सुधारणा केली जात नसल्यामुळे या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असणे, रस्त्यात अनेक ठिकाणी उंचवटे व खोलगट भाग तयार झाल्यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असणे, राज्य शासनाच्या अखत्यारीतील ठाणे ते वडपे दरम्यान खड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असणे, राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील नाशिक ते ठाणे या रस्त्याच्या दुरावस्थेवर व येथील वाहतूक नियोजनाबाबत उपाययोजना करणेची आवश्यकता, त्यामुळे सहापदरी रस्ता होईपर्यंत या संपूर्ण रस्त्याचे नुतनीकरण करण्याचे काम तातडीने हाती घेणेबाबत राज्यशासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १५७, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. रोहित पवार** |
| (१९) | ४५२४ | १० | तात्कालीन वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 11मार्च 2022रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला असून त्यात कर्जत जामखेड जिल्हा अहमदनगर येथील 5054(4) ची कामे सभागृहाच्या मान्यतने मंजुरी दिली असून सदरील कामे प्रगतीत देखील आहेत असे असून देखील शासन स्तरावरून सदरील कामांना स्थगिती दिल्याने स्थगिती उठविणे बाबत निवेदन देऊन विनंती केली असून अद्यापही स्थागिती उठविलेली नाही, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १५८, रूपये:- ३,६३,००,००,०००/-**<br>**अॅड. माणिकराव कोकाटे** |
| (२०) | ४६१७ | १० | नाबार्ड कर्ज अर्थसहाय्य योजनेंतर्गत रस्ते व पुलांच्या बांधकामांसाठी रक्कम रुपये ३६३०००००० इतक्या अतिरिक्त तरतूद करणेत आलेली असणे, जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत मतदारसंघात दोन ते तीन वेळा झालेल्या अतिवृष्टीने (ढगफुटी) मतदार संघातील मोठे पूल पुराच्या पाण्याने अक्षरशः वाहून गेले त्यामुळे सदर तरतुदीनुसार सिन्नर मधील नाबार्ड २८ अंतर्गत मंजूर करावयाची स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची आग्रही मागणी असून तशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री,सार्वजनिक बांधकाम मंत्री ,यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी करणे, सदर पुलांचे बांधकाम करणे दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असणे असे असतांना शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार** |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२१) | ४६१८ | १० | नाबार्ड कर्ज अर्थसहाय्य योजनेंतर्गत रस्ते व पुलांच्या बांधकामांसाठी रक्कम रुपये ३६३०००००००० इतक्या अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली असणे, माहे जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत कळवण-सुरगाणा मतदारसंघात दोन ते तीन वेळा झालेल्या अतिवृष्टीने (ढगफुटी) मतदार संघातील मोठे पूल पुराच्या पाण्याने अक्षरशः वाहून गेले त्यामुळे सदर तरतुदीनुसार कळवण-सुरगाणा मध्ये नाबार्ड २८ अंतर्गत मंजूर करावयाची स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची आग्रही मागणी असून तशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री ,यांच्याकडे माहे ऑक्टोबर २०२२ रोजी करणे, सदर पुलांचे बांधकाम करणे दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असणे असे असतांना शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (२२) | ४६१९ | १०० | नाबार्ड तर्फे २८ कर्ज अर्थसहाय्य योजनेंतर्गत (१)साकोरे ते उंबरखेड रस्ता ग्रामा-१०० वर सा.क्र.०/५०० मध्ये कादवा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करणे (२) पिंपळगाव ते आहेरगाव रस्ता ग्रामा -३८ वर सा.क्र.२/२०० मध्ये नेत्रावती नदिवर आहेरगाव गावाजवळ लहान पुलाचे बांधकाम करणे (३) उगाव आहेर वस्ती, ब्राम्हणगाव रस्ता ग्रामा - ३२४ सा.क्र.१/२०० मध्ये प्रमुख राज्यमार्ग - २ नैताळे ते (राज्यमार्ग-२७) दिंडोरी खानगाव थडी तारुखेडले तामसवाडी झुंगे खेडलेझुंगे कोळगाव रुई धानोरे डोंगरगाव विंचूर विठ्ठलवाडी कोटमगाव राज्यमार्ग - २७ ला मिळणारा रस्ता प्रजिमा -१२५ सा.क्र.१२/४०० , १३/१००, १४/४००, १८/६०० व १८/८०० मध्ये स्लॅबड्रेनचे बांधकाम करणे (४) ब्राम्हणवाडे नायगाव चाटोरी सायखेडा भुसे मांजरगाव रामा क्र.२७ ला मिळणारा रस्ता प्रजिमा - २७ सा.क्र.१४/०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे आदी कामे महत्वाची व दळणवळणाच्या दुष्टीकोनातून महत्वाची असल्याने या कामांना नाबार्ड अर्थसहाय्य योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देऊन मंजुरी देण्यात यावी परंतु अद्यापही सदर कामांना मंजुरी मिळाली नसणे, नाबार्ड अंतर्गत रस्ते व पुलांच्या बांधकामांसाठी रक्कम रुपये ३६३०००००००० इतक्या अतिरिक्त तरतूद करणेत आलेली असणे, सदर तरतुदीनुसार उपरोक्त कामांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १६५, रूपये:- २९,२४,२०,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (२३) | ४५५७ | १०० | निफाड (जि. नाशिक) तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये -निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ९.१२.२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव पाठविलेला असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|

सदर प्रस्तावातील निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये-निवासस्थान (रक्कम रु. ११० लक्ष) इमारत बांधकामांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नसणे, जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या दि. ९.१२.२०२२ च्या प्रस्तावातील उर्वरित निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**पूरक मागणी क्रमांक: एच-८**
**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**
**बाब क्रमांक: १६८, रूपये:- १,०००/-**
**श्री. रोहित पवार**

(२४) ४५२२ १० तात्कालीन वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 11मार्च 2022रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला असून त्यात कर्जत जामखेड जिल्हा अहमदनगर येथील शासकीय विश्रामगृहाची कामे सभागृहाच्या मान्यतने मंजुरी दिली असून सदरील कामे प्रगतीत देखील आहेत कामांचा निधी मागणी प्रस्ताव शासनस्तरावर सादर करणेत आला असून निधी वर्ग करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**श्री. छगन भुजबळ**

(२५) ४५५८ १०० येवला (जि. नाशिक) शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्याची नितांत आवश्यकता असणे, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी दि. ५ मार्च, २०२१ च्या पत्रान्वये या कामाचे रक्कम रु. ५३३ लक्षचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केलेले असणे, येवला शहर है पैठणीचे प्रमुख केंद्र असून प्रसिद्ध पर्यटनस्थळ असणे, येथील अस्तित्वातील विश्रामगृह वापरण्यासाठी अनुकूल नसल्याने त्याचे विस्तारीकरण करणे आवश्यक असणे, येवला येथे शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करणे या कामाला प्रशासकीय मान्यता देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**पूरक मागणी क्रमांक: एच-८**
**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली व खर्च**
**बाब क्रमांक: १७४, रूपये:- २,०००/-**
**श्री. संजय जगताप**

(२६) ४७२४ १० डॉ. बादोंरवाला लेप्रसी हॉस्पीटल कोंढवा, ता. हवेली, जि.पुणे येथील शासकीय रुग्णालय परिसरा भोवती सिमाभिंत बांधण्यास जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिली असूनही सिमाभिंत बांधली नसणे, सिमा भिंत बांधण्याची आवश्यकता असणे, सिमाभिंत नसल्यामुळे भटक्या कुत्री, फिरती जनावरे, उपद्रवी व्यक्तींचा वावर वाढला असणे, त्यामुळे रुग्णांच्या सेवेवर परिणाम होणे, तसेच रात्रपाळीत काम करणा-या महिला कर्मचा-यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होत असणे

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष परिणामी रुग्णांमध्ये व कर्मचा-यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १७६, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (२७) | ४५५९ | १०० | ग्रामिण रुग्णालय नगरसुल ता.येवला, जि.नाशिक येथील इमारत दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे या रक्कम रु. ४९९.९४ लक्षच्या पाच कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी दि. २० मे २०२२ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर इमारत दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२८) | ४५६० | १०० | ३० खाटांच्या येवला (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाले असून सदर उपजिल्हा रुग्णालय कार्यरत झालेले असणे, या रुग्णालयातील कर्मचारी निवासस्थानाचे रक्कम रु. १४९८.७४ लक्ष रकमेचे अंदाजपत्रक आराखड्यासह प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव सादर केलेला असणे, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी दि. १७ मे, २०२२ च्या पत्रान्वये हा प्रस्ताव शासनास सादर केलेला असणे, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय येवला जि.नाशिक येथील कर्मचारी निवासस्थाने बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | ४५६१ | १०० | लासलगाव ता. निफाड जि.नाशिक येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये दि. ६ एप्रिल २०२२ शासन निर्णया अन्वये श्रेणीवर्धन करण्यात आले असणे, सदर ३० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक यांनी दि. २३/०८/२०२२ च्या पत्रान्वये आयुक्त तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या कार्यालयाला प्रस्ताव पाठविलेला असणे, लासलगाव ता.निफाड जि.नाशिक येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाल्यामुळे अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : २१ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर